मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक येथील ८९ दुरुस्ती कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: मुजयो-२०२२/प्र.क्र-२४/जल-१**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २७ जानेवारी, २०२२.

वाचा:

१. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.कोपबं -२०१८/प्र.क्र.१८३/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
२. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र.लपायो -२०१८/प्र.क्र.१७७/ जल-०१, दि.२०/७/२०१८.
३. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.लपायो १०९९/प्र.क्र.३४७/जल-१ दि.३१/७/२०००
४. शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र. मुजयो-२०२०/प्र.क्र.७६/जल-०१, दि.१७/०२/२०२१.
५. अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, औरंगाबाद यांचे पत्र क्र. तांशा-२/३०६/सह, दि. २१.१२.२०२१

**प्रस्तावना-**

राज्यातील पूर्ण झालेल्या जलसंधारण योजनांपैकी देखभाल व दुरुस्ती आवश्यक असलेल्या योजनांचे परिरक्षण व दुरुस्ती करुन सिंचन क्षमता पुनर्स्थापित करण्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना संदर्भीय शा. नि क्र. ४ अन्वये राबविण्यात येत आहे. नाशिक मंडळ कार्यालयांतर्गत एकूण ८९ योजनांची दुरुस्ती करण्यात येणार असुन दुरुस्तीसाठी एकूण रक्कम रु. १८८७.६३ लक्ष इतकी आहे. सदर कामांची सिंचन क्षमता २०४७ हे. व एकूण पाणीसाठा ९२१२ सघमी इतका आहे. सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ५ अन्वये शासनास सादर झाला आहे. प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांनी आपल्या स्तरावर सर्व अंदाजपत्रकांची छाननी/ तपासणी केली आहे. उपरोक्त बाबींचा विचार करून उल्लेखित ८९ कामे मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेच्या आराखड्यात समाविष्ट असल्याने प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत नाशिक प्रादेशिक जलसंधारण विभागातील एकूण ८९ दुरुस्ती योजनांची अंदाजपत्रकिय किंमत **रुपये १८८७.६३ लक्ष (अक्षरी अठरा कोटी सत्याऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार फ़क्त)** इतकी आहे. या किंमतीच्या अंदाजपत्रकांना खालील अटीं व शर्तीच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) उपरोक्त पैकी प्रत्येक योजनेस स्वतंत्ररित्या प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. आदेश एकत्रित केलेला आहे.

२) पाणी वापर संस्था स्थापन करण्यासाठी ठेकेदारास निविदेत अटी घालून बंधनकारक करण्यात यावे. WUA स्थापन होईपर्यंत निविदेच्या १०% रक्कम ठेकेदाराच्या देयकातून कपात करण्यात यावी. संस्था स्थापन झाल्यानंतर सदरची रक्कम वितरित करण्यात यावी. अपवादात्मक परीस्थितित संस्था स्थापित होऊ शकत नसल्यास सविस्तर कारणमीमांसेसह प्रस्ताव शासनास सादर करून शासनाच्या मान्यते नंतर कपात केलेली १०% निधी वितरित करण्यात यावा. पाणी वापर संस्था स्थापन केल्या बद्दल ठेकेदारास मृद व जलसंधारण विभाग शा.नि.क्र: लपायो-२०१८/प्र.क्र:१७७/जल-१दिनांक २०-०७-२०१८ मधील भाग C नुसार मानधन देण्यात यावे.

३) शासन निर्णय दिनांक २०-०७-२०१८ मधील तरतुदीनुसार दुरुस्ती करण्यात यावी.

४) दुरुस्तीच्या अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकारी यांनी तांत्रिक मान्यता द्यावी.

५) दुरुस्तीच्या कामाचादोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) हा ५ वर्ष राहील.

६) दुरुस्तीच्या कामांचे Geotag व वेळे सह व्हिडीओ चित्रीकरण बंधनकारक राहील.

a) काम सुरू करण्यापूर्वी
b) २५% पूर्ण झाल्यानंतर.
c) ५०% काम पूर्ण झाल्यानंतर.
d) ७५% काम पूर्ण झाल्यानंतर.
e) १००% काम पूर्ण झाल्यानंतर.

या कामात पाच टप्प्यात Geotag व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे. प्रत्येक टप्प्याच्या व्हिडिओ चित्रीकरणाचा कालावधी किमान ३ मिनिटाचा आवश्यक राहील.

i) काम सुरू करण्यापूर्वी एका बाजूने चित्रीकरण सुरुवात करून दुसऱ्या टोकापर्यंत संपूर्ण चित्रीकरण करण्यात यावे.

ii) व्हिडीओ चित्रीकरण करताना प्रत्येक वेळेस कामाचे जलसंधारण अधिकारी व कंत्राटदार/ त्यांचा प्रशिक्षित तांत्रिक कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे. किमान दोन वेळेस खुद्द कंत्राटदाराची उपस्थिती आवश्यक आहे.

iii) चित्रीकरणांमध्ये किमान दोन टप्प्यांमध्ये उप अभियंता ब एका टप्प्यामध्ये कार्यकारी अभियंता यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

iv) देयके पारित करताना मोजमाप पुस्तिका सोबत चित्रीकरणाचा PenDrive सादर करावा. तसे मोजमाप पुस्तिकेत नमूद करावे.

v) सदर चित्रीकरणाची प्रत कार्यकारी अभियंता यांनी तपासावी व वरील सूचनांप्रमाणे चित्रीकरण नसल्यास देयक पारित करून होणार नाही.

vi) चित्रीकरणाची किमान १५ सेकंदांची संक्षिप्त प्रत विभागाच्या जिओपोर्टलवर Upload करण्यात यावी.

७) कामाची गुणवत्ता उत्तम दर्जाची राहील याची सर्वस्वी जबाबदारी जलसंधारण अधिकारी/ उपविभागीय जलसंधारण अधिकारी/ जिल्हा जलसंधारण अधिकारी यांची राहील. गुणनियंत्रण चाचण्या मापदंडानुसार करण्यात याव्यात.

८) क्रॉस चेकिंगसाठी इतर विभागाच्या अखत्यारीतील उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांनी दुरुस्तीचे काम सुरू असताना तपासणी करावयाची आहे. त्यांची नियुक्ती प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनी करावी.

९) काम पूर्ण झाल्यानंतर कामाची गुणनियंत्रणाच्या दृष्टीने विभागाच्या दक्षता व गुणनियंत्रण पथकाकडून तपासणी करण्यात यावी.

१०) ज्या योजनांची अंदाजपत्रकीय किंमत/ दुरुस्तीचा खर्च हा २०% पेक्षा जास्त येत असेल अशा योजनांची दुरुस्तीची अंमलबजावणी शासन निर्णय २०.०७.२०१८ मधील मार्गदर्शक सुचना क्र. ७(१) मधील तरतूदीनुसार करण्यात यावी.

११) गाळ काढण्याचे काम हे लोकसहभागातून, रोहयोतून किंवा यांत्रिकी विभागामार्फ़त करण्यात यावे.

१२)कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घेण्याची संपूर्ण जबाबदारी जिल्हा जलसंधारण अधिकारी व उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांची राहिल.

१३) सदर दुरुस्तीचे प्रस्ताव प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांचे स्तरावर तपासणी केली असल्याने प्रस्तावात अपूर्ण माहिती किंवा चूकीची माहिती दिल्याचे निदर्शनास आल्यास यास सर्वस्वी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी व त्यांचे अखत्यारीतील संबंधीत क्षेत्रीय अधिकारी जबाबदार राहतील.

१४) केलेल्या कामाचा तपशील ग्रामसभेसमोर ठेवण्यात यावा.

१५) ज्या योजनांची दुरुस्ती केल्यावर सिंचन क्षेत्र पुनर्स्थापित होत नाही अशा योजनांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येऊ नये.

१६) शासन निर्णय मृद व जलसंधारण विभाग क्र. मुजयो-२०२०/प्र.क्र.७६/जल-१, दि. १७/०२/२०२१ मध्ये देण्यात आलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात यावे.

२.० या ८९ योजनांच्या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षातर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

**० ते १०० हे. सिंचन क्षमतेच्या योजनांकरिता लेखाशिर्षः-**

**लेखाशिर्ष ४७०२-ए०४६**

**(०२)(०१)लहान पाटबंधारे योजना**

**० ते १०० हेक्टर सिंचन क्षमता परिरक्षण व दुरुस्ती (कार्यक्रम)**

**५३, मोठी बांधकामे**

३.० सदरहू योजनांच्या दुरुस्तीच्या कामास वरील लेखाशिर्षातर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४.० प्रस्तुत आदेश प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२०१२७१६११३५२१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DILIP SHAMRAO PRAKSHALE

Digitally signed by DILIP SHAMRAO PRAKSHALE DN: CN = DILIP SHAMRAO PRAKSHALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT Date: 2022.01.27 16:11:59 +05'30'

**( दि. शा. प्रक्षाळे )**

**मुख्य अभियंता तथा पदसिद्ध सह सचिव,**

**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मंबई.

२) मा.मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव.

३) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, विधानभवन,मुंबई.

४) सर्व मा.संसद सदस्य,विधान मंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.

५) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खासगी सचिव

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधानसचिव/सचिव.

८) मा.मंत्री (मृद व जलसंधारण)यांचे खाजगी सचिव

९) मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण)यांचे खाजगी सचिव.

१०) सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक

११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१२) आयुक्त मृद व जलसंधारण, जल आयुक्तालय, औरंगाबाद.
१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक, अहमदनगर
१५) अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, औरंगाबाद.
१६) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक.
१७) प्रादेशिक दक्षता गुणनियंत्रण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद.
१८) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर.
१९) कार्यासन अधिकारी (जल-४), जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) निवडनस्ती (जल-१).

मृद व जलसंधारण विभाग

जोडपत्र अ

**मुख्यमंत्री जलसंवर्धन योजने अंतर्गत अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र औरंगाबाद यांचे अधिपत्याखालील प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक यांचे अंतर्गतच्या जलसंधारण उपचार बांधकामांच्या आवश्यक दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा गोषवाराः-**

**शासन निर्णय क्रमांक: मुजयो-२०२२/प्र.क्र-२४/जल-१ दिनांकः- २७ जानेवारी, २०२२.**

| अ.क्र | कामाचे नाव | गाव | जिल्ह्याचे नाव | तालुक्याचे नाव | सिंचन क्षमता (हेक्टर) | पाणीसाठा (सघमी) | दुरुस्तीची प्रस्तावित किंमत रुपये लक्ष | प्रचलित आर्थिक मापदंडानुसार प्रस्तावित किंमतीची परिगणित टक्केवारी % | प्राधान्य क्रम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पा.त.दुरुस्ती मिरी क्र.२ | मिरी | अहमदनगर | पाथर्डी | ३२ | १४२ | ६३.४२ | १४९.७६ | २ |
| २ | पाझर तलाव दुरुस्ती अरणगाव(पिंपळडोह) | अरणगाव | अहमदनगर | नगर | १५ | ७१ | ४४.७९ | २२५.६६ | १ |
| ३ | पाझर तलाव दुरुस्ती खंडाळा | खंडाळा | अहमदनगर | नगर | ११ | ५२ | ३७.७९ | ५४.९२ | १ |
| ४ | सि.ना.बा.दुरुस्ती खांबे कुंड | खांबे | अहमदनगर | संगमनेर | १३ | ६० | ९.७८ | ११.४० | १ |
| ५ | सि.ना.बा.दुरुस्ती खांबे चिमणमळई | खांबे | अहमदनगर | संगमनेर | ११ | ५० | ७.३२ | १०.२४ | १ |
| ६ | पाझर तलाव दुरुस्ती दुरुस्ती कोरेगाव (माउलाईनाला) | कोरेगाव | अहमदनगर | श्रीगोंदा | ३२ | १५२ | ३४.६४ | १७.२३ | १ |
| ७ | पाझर तलाव दुरुस्ती देसवडे (पारदरा) | देसवडे | अहमदनगर | पारनेर | ५५ | २५८ | ४९.८५ | १४.६० | २ |
| ८ | पाझर तलाव दुरुस्ती पोखरी (पारदरा) | पोखरी | अहमदनगर | पारनेर | ३० | १४१ | २०.५६ | ११.०२ | २ |
| ९ | पाझर तलाव दुरुस्ती वारणवाडी (मुंजाबा) | वारणवाडी | अहमदनगर | पारनेर | १७ | ७९ | १५.४८ | १४.८१ | २ |
| १० | पा.त.दुरुस्ती कान्हुर पठार (दुबेमळा) | कान्हुर पठार | अहमदनगर | पारनेर | १४ | ६८ | ३०.४२ | ३३.८० | २ |
| ११ | पा.त.दुरुस्ती किन्ही (जांभुळ नाला) | किन्ही | अहमदनगर | पारनेर | २४ | ११६ | १५.३१ | ९.१७ | २ |